***7.1.9 - Sensitization of students and employees of the Institution to the constitutional obligations - values, rights, duties and responsibilities of citizens***



लोकमत

नाशिक । शनिवार

२०.२.२०२१

**बिटको महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात**

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : नाशिकरोड येथील बिटको महाविद्यालयात हिंदवी साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न झाली. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ.संजय तुपे, उपप्राचार्य डॉ. मंजूषा कुलकर्णी, डॉ. महेश औटी यांसह प्रा. लक्ष्मण शेंडगे, प्रा.नीलेश महाजन, प्रा. शशिकांत खेमनर, प्रा.कैलास बोरसे, संजय परमसागर, अरुण ताजनपुरे, अशोक अहिरे ,अनिल गोरे, विजय सूर्यवंशी, शिवा शहाणे, राजू कनोजिया, भूषण शेंडे यासह विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.



**प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण**







प्रतिनिधी- रविंद्र जाधव

**बिटको महाविद्यालयात भारतरत्न डॉ. आंबेडकर यांना आदरांजली**

लक्ष महाराष्ट्र

नाशिकरोड । गोखले एज्युकेशन सोसायटीच्या नाशिकरोड येथील बिटको महाविद्यालयात भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६४ वा महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन सभा आयोजित करण्यात आली होती. प्राचार्य डॉ. राम कुलकर्णी व डॉ.संजय तुपे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला व मेणबत्ती प्रज्वलित करण्यात येऊन सामुदायिक बुद्धवंदना करून आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी रोहीणी पाईकराव या विद्यार्थिनीने गीत सादर केले. यावेळी डॉ. मंजूषा कुलकर्णी, डॉ. महेश औटी, डॉ. आर.बी., बागुल, डॉ.सुदेश घोडेराव, प्रा. सिद्धार्थ निंबाळकर, निलेश महाजन, अनिल सावळे व डॉ. अश्विनी घनबहादुर उपस्थित होते.



*7.1.9 - Sensitization of students and employees of the Institution to the constitutional obligations - values, rights, duties and responsibilities of citizens*



बिटको महाविद्यालयात आदरांजली



लोकमत

एनएसएसच्या विद्यार्थ्यांची हरित शपथ

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिकरोड : बिटको महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस)च्या विद्यार्थ्यांनी ...

Scanned with CamScanner



# बिटको महाविद्यालयामध्ये 'आदर स्त्रीत्वाचा, जागर शक्तीचा'

**नाशिकरोड (प्रतिनिधी)** :- देशाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल, तर स्त्रियांना समान संधी देऊन महिला सक्षमीकरण करण्याची गरज आहे. आपल्या घराच्या उत्कर्षामध्ये व प्रगतीमध्ये स्त्रीची भूमिका खूप मोलाची असते. आपत्तीशी सामना करताना पुरुषांपेक्षा एक उत्तम व्यवस्थापिका असल्याचे ती सिद्ध करते. सातारा जिल्ह्यातील "मिलिटरी अपशिंगे" येथील गावात प्रत्येक घरातील एक पुरुष सैनिक असून, देशासाठी येथील अनेक युवक सैनिक धारातीर्थी पडले.

झाशीच्या राणीचे पूर्वज देखील या गावातील होते. येथील विधवांच्या धैर्याला अनेक सलाम... स्त्रीत्व म्हणजे एकरूपता, समरसता आणि त्यागी वृत्ती आहे. सर्व परिस्थितीचा सामना करून महिलांना आर्थिक व सामाजिक स्वावलंबी बनविल्यास आपला देश खऱ्या अर्थाने प्रगतीकडे वाटचाल करेल, असे मार्गदर्शन करताना डॉ. दीपाली जाधव यांनी केले.

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या नाशिकरोड येथील बिटको महाविद्यालयात काल दि. ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना वतीने बारामती येथील (वर्ल्ड रेकॉर्ड इंडिया होल्डर) प्रा. डॉ. दीपाली जाधव यांचे 'आदर स्त्रीत्वाचा, जागर शक्तीचा' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्याप्रसंगी त्या उपस्थित विद्यार्थी व शिक्षक यांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. कार्यक्रम अधिकारी प्रा. गणेश दिलवाले यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. डॉ. अर्चना पाटील यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय तुपे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. या भाषणात त्यांनी नारीशक्तीचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. कांचन सनानसे यांनी मानले.

Daily_Bhramar_of_09_March_2021 PAGE 4 OF 6



# बिटको महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात

**नाशिकरोड (प्रतिनिधी)** :- येथील बिटको महाविद्यालयात विद्यार्थी विकास व एनएसएसतर्फे भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला.



नाशिकरोड : बिटको महाविद्यालयात फीट इंडिया मुव्हमेंट फेरीत सहभागी झालेले प्राध्यापक व विद्यार्थी.

# बिटको महाविद्यालयात फीट इंडिया मुव्हमेंट अंतर्गत फेरी

नाशिकरोड : वार्ताहर



Nashik City ePaper: Rea...

n.epaperdivyamarathi.bhaskar.com

divyamarathi.com

8, Dec | Nashik City

PAGE 3

# शिक्षणाने कर्तव्य व हक्कांची जाणीव : डॉ. कुलकर्णी